सबसे 'तेज' ग्लोबल महातेज...!

Postal Regd. No. JAL/443/2025-2027

# ग्लोबल महातेज

https://epaper.globalmahatej.com/

RNI. NO. MAHBIL /25/A0192

वर्ष १ ले | अंक : २६० | शुक्रवार, दि. १२ जून २०२६ | पाने : ४ | अमळनेर | किंमत : ३ रुपये | Email - globalmahatej@gmail.com

रवि ज्वेलर्स
सराफ बाजार, अमळनेर.
मो. ७०७४७४२१२१
सोने-चांदी
आजचे भाव
२४ Ct सोने ९९.५०% : ₹ १४६०००
२२ Ct सोने ९१.६०% : ₹ १३४३००
१८ Ct सोने ७५.००% : ₹ ११२०००
शुद्ध चांदी ९९९% : ₹ २३६०/-
भाव प्रती १० ग्राम

आजचे अभीष्टचिंतन



श्री. सुनील चव्हाण
अमळनेर

गर्व से कहो स्वदेशी है हम...!
स्वदेशी ही खरिदेंगे हम...!!

स्वातंत्र्यपूर्व संग्रामातील स्वदे शीची हाक आता पुन्हा देवू या. नवरात्रोत्सवात आपण आदिमाया आदिशक्तीचा जागर करतो त्याप्रमाणेच स्वदेशीचाही जागर करूया..! सच्च्या भारतीयांवर जेव्हा-जेव्हा परकीय आक्रमण होते तेंव्हा-तेंव्हा ते प्रचंड त्वेषाने पेटून उठतात...!! आता तीच वेळ येऊन ठेपली आहे...!!!
जय भारत...!
जय स्वदेशी...!!

# स्वामींच्या आशीर्वादाने समाजपरिवर्तनाची साद
# 'देऊळ बंद-२' टीम आज अमळनेरात

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : स्वामी समर्थांचा महिमा, व्यसनाधीनतेपासून दूर राहण्याचा संदेश आणि शेतकरी आत्महत्यांसारख्या ज्वलंत प्रश्नांवर भाष्य करणारा 'देऊळ बंद-२' हा चित्रपट सध्या सर्वत्र चर्चेचा विषय ठरला आहे. हा चित्रपट केवळ मनोरंजन न करता सामाजिक जाणिवा जागृत करण्याचे काम करत आहे. या चित्रपटाची टीम १२ जून रोजी अमळनेरच्या एस.एस. सिनेप्लेक्स (मिडटाऊन) येथे प्रेक्षकांशी थेट संवाद साधण्यासाठी येत आहे.

**खान्देशात स्वामी भक्तीचा मोठा आधार**

खान्देशात स्वामी समर्थांना मानणारा मोठा वर्ग आहे. अध्यात्म आणि निस्सीम भक्तीने अनेक कुटुंबांना व्यसनांच्या आहारी जाण्यापासून परावृत्त केले आहे. स्वामींच्या विचारांतून जीवनाला नवी दिशा मिळते, याच भावनेने खान्देशातील नागरिक या चित्रपट पाहण्यास विशेष पसंती देत आहेत. देऊळ बंद-२ च्या माध्यमातून प्रेक्षकांना केवळ स्वामींचे दर्शन घडत नाही, तर सामाजिक संकटांशी लढण्याची प्रेरणाही मिळत आहे.

**५० कोटींचा टप्पा पार; सामाजिक बांधिलकी जपणारा उपक्रम**

प्रदर्शनाच्या पहिल्या आठवड्यातच या चित्रपटाने ५० कोटींहून अधिक कमाई करत बॉक्स ऑफिसवर यश मिळवले आहे. या यशापेक्षाही मोठा महत्त्वाचा निर्णय निर्माते कैलास बापू वाणी आणि दिग्दर्शक प्रवीण तरडे यांनी घेतला आहे. चित्रपटातून होणारी कमाई आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या मुलांच्या शिक्षणासाठी खर्च करण्याचा निर्णय त्यांनी जाहीर केला आहे. या




उपक्रमाचे सर्वस्तरातून स्वागत होत आहे.

**आज मंगळग्रह मंदिरात भेट**

संपूर्ण चित्रपटाची टीम श्री.मंगळग्रह मंदिर देवस्थानाला सकाळी १० च्या सुमारास भेट देणार आहे.श्री मंगळग्रह मंदिरात श्री.मंगळग्रह आणि श्री स्वामी समर्थांचे दर्शन घेणार आहे. चित्रपटाची संपूर्ण टीम सध्या महाराष्ट्र दौऱ्यावर असून, १२ जून रोजी दुपारी १२ ते ३ या सत्रात एस.एस. सिनेप्लेक्स, मिडटाऊन येथे प्रेक्षकांशी संवाद साधणार आहे. स्वामी समर्थ केंद्राचे डॉ. अमोल पाटील यांनी अमळनेरकर स्वामी भक्तांना, चित्रपट रसिकांना आणि नागरिकांना मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे.

## श्री स्वामी समर्थांचा महिमा

महाराष्ट्रात श्री स्वामी समर्थ यांच्याविषयी असलेली भक्ती अत्यंत व्यापक आणि भावनिक स्वरूपाची आहे. यामागे धार्मिक, ऐतिहासिक, सांस्कृतिक आणि वैयक्तिक अनुभवांची परंपरा आहे. श्री.मंगळग्रह मंदिरात जगातील एकमेवाद्वितीय स्वामी समर्थांची प्रतिमा आहे.तिचे विलोभनीय रूप स्वामींच्या साक्षात्काराचे ,त्यांच्या



भक्तितल्लीन करते.स्वामी समर्थ नावाचे वलय मोठे आहे.नवीन पिढीने त्यांना पाहिलेले नाही परंतु त्यांची प्रचिती नित्य भक्ताना येते.स्वामी नावाचे स्तोम नाही,जातीवाद नाही.आहे फक्त सामंत,माणुसकी,सर्वाना प्रेमाची शिकवण देण्याची महती.

**महाराष्ट्रीयन लोकांची स्वामी समर्थांवर जास्त भक्ती का आहे?**

"भिऊ नकोस, मी तुझ्या पाठीशी आहे"स्वामी समर्थांच्या या वचनाने लाखो भक्तांना मानसिक आधार दिला आहे. संकटसमयी स्वामी आपल्याबरोबर आहेत, अशी श्रद्धा भक्तांच्या मनात दृढ आहे. ***महाराष्ट्रातील प्रत्यक्ष वास्तव्य*** – स्वामी समर्थांनी अक्कलकोट येथे दीर्घकाळ वास्तव्य केले. त्यामुळे महाराष्ट्रातील जनमानसाशी त्यांचे विशेष नाते निर्माण झाले.

***सर्वसामान्यांपर्यंत पोहोचलेली भक्ती*** – स्वामी समर्थांनी जात, पंथ, श्रीमंती किंवा गरिबीचा भेद न मानता सर्वांना समान दृष्टीने मार्गदर्शन केले. त्यामुळे ग्रामीण आणि शहरी दोन्ही भागांत त्यांची भक्ती लोकप्रिय झाली.

***दत्तसंप्रदायातील स्थान*** – *स्वामी समर्थांना श्री.दत्तात्रय यांचा अवतार मानले जाते. महाराष्ट्रातील दत्तभक्तीची परंपरा प्राचीन असल्यामुळे स्वामी समर्थांविषयी विशेष आदर आहे.*

***स्वामी मार्गावर आलेल्या भक्तांचे सामान्य अनुभव –***

*मानसिक तणाव कमी होणे.संकटसमयी अनपेक्षित मदत मिळाल्याची भावना.आत्मविश्वास वाढणे. घरातील कलह कमी होणे.व्यसनांपासून दूर जाण्याची प्रेरणा मिळणे.नामस्मरणामुळे मन शांत होणे.जीवनाकडे सकारात्मक दृष्टिकोन निर्माण होणे. हे अनुभव श्रद्धा आणि वैयक्तिक आध्यात्मिक अनुभूतींवर आधारित असतात. प्रत्येक व्यक्तीचा अनुभव वेगळा असू शकतो.*

***स्वामीभक्तीमुळे जीवनावर झालेले सकारात्मक परिणाम –***

*आध्यात्मिक परिणाम –ईश्वरावरील विश्वास दृढ होतो.नामजपाची सवय लागते.संयम आणि सहनशीलता वाढते.अहंकार कमी होण्यास मदत होते.*

***मानसिक परिणाम*** – *चिंता आणि भीती कमी होण्यास मदत होते.कठीण परिस्थितीत धैर्य मिळते.मनाला स्थैर्य प्राप्त होते.*

***सामाजिक परिणाम*** *–सेवाभाव वाढतो.दानधर्म आणि परोपकाराची प्रेरणा मिळते.कुटुंबातील नातेसंबंध अधिक दृढ होतात.*

***वैयक्तिक परिणाम*** *–सकारात्मक विचारसरणी निर्माण होते.शिस्तबद्ध जीवन जगण्याची प्रेरणा मिळते.संकटांना सामोरे जाण्याची क्षमता वाढते.*

***स्वामीभक्तांचा विश्वास*** – *अनेक भक्तांच्या मते, स्वामी समर्थ हे केवळ संत नसून जिवंत अनुभूती देणारे गुरुतत्त्व आहेत. भक्तांचा विश्वास आहे की निस्सीम श्रद्धा, नामस्मरण आणि सदाचार यांमुळे स्वामींची कृपा प्राप्त होते.*

**"श्री स्वामी समर्थ, भिऊ नकोस, मी तुझ्या पाठीशी आहे."याच श्रद्धेच्या बळावर असंख्य भक्त जीवनातील संकटांना सामोरे जातात आणि स्वामींच्या कृपेमुळे मानसिक शांती, धैर्य व आत्मविश्वास मिळाल्याचा अनुभव व्यक्त करतात.**

# धुळ्यातील दोघांकडून अश्लील चाळे; पोलीसांकडून प्रतिबंधात्मक कारवाई

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : शहरातील एका प्रसिद्ध मारोती मंदिराच्या जवळील सार्वजनिक ठिकाणी अश्लील चाळे करणाऱ्या एका जोडप्यावर अमळनेर पोलिसांनी प्रतिबंधक कारवाई केली आहे. सदर जोडपे धुळे जिल्ह्यातील असून, पोलिसांनी त्यांना समज देऊन सोडून दिले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, गुरुवार, दि. ११ रोजी दुपारी ४ वाजेच्या सुमारास शहरातील मारोती मंदिरा जवळील एका सार्वजनिक ठिकाणी एक महिला व पुरुष अत्यंत आक्षेपार्ह आणि अश्लील चाळे करत असल्याचे नागरिकांच्या निदर्शनास आले. पवित्र धार्मिक स्थळाजवळ आणि सार्वजनिक ठिकाणी घडणाऱ्या या प्रकारामुळे परिसरात काही काळ अस्वस्थता निर्माण झाली होती.

या घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी तात्काळ कारवाई करत संबंधित महिला व पुरुषाला ताब्यात घेतले. याप्रकरणी अमळनेर पोलिसांनी दोन्ही व्यक्तींविरुद्ध महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ११२ व ११७ अन्वये प्रतिबंधक कारवाई केली आहे.

त्यानंतर पोलिसांनी ठाण्यातील ताकीद रजिस्टरमध्ये या घटनेची रीतसर नोंद केली. "यापुढे सार्वजनिक ठिकाणी अशा प्रकारचे कोणतेही असभ्य कृत्य करणार नाही," अशी लेखी हमी पोलिसांनी त्यांच्याकडून घेतली. सदर जोडप्याने आपल्या चुकीची कबुली देत, पुन्हा अशी कृती करणार नसल्याची विनंती पोलिसांकडे केली. त्यानंतर पोलिसांनी त्यांना कडक समज व ताकीद देऊन मुक्त केले. हे जोडपे धुळे जिल्ह्यातील रहिवासी असल्याची माहिती समोर आली आहे.





# अमरधाममध्ये सुविधांचा अभाव; प्रशासनाकडून सुधारणांना सुरुवात

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील चोपडा रोडवरील अमरधाम सुविधांच्या अभावामुळे होणारी मृतदेहांची विटंबना आणि कुत्र्यांचा उपद्रव या संदर्भातील एक व्हिडिओ सामाजिक माध्यमांवर मोठ्या प्रमाणावर व्हायरल झाला होता. या गंभीर प्रकरणाची दखल घेत अमळनेर नगरपरिषद प्रशासनाने तातडीने हालचाली सुरू केल्या असून, अमरधाम मूलभूत सुविधा देण्यास सुरुवात केली आहे.

**नेमका प्रकार काय होता?**

अमरधाममध्ये अंत्य-संस्कारासाठी अपुरी सरणे, कर्मचारी वर्गाचा अभाव आणि भटक्या कुत्र्यांकडून मृतदेहांची होणारी विटंबना या गंभीर समस्यांमुळे शहरात तीव्र संताप व्यक्त केला जात होता. नगरसेविका शोभाबाई गढरे यांनी प्रशासनावर या बाबींवरून प्रश्नचिन्ह उपस्थित करत जाब विचारला होता. नागरिक आणि लोकप्रतिनिधींकडून टीकेची झोड उठल्यानंतर प्रशासन खडबडून जागे झाले.

**युद्धपातळीवर उपाययोजना**

जनभावनांचा विचार करता पालिका प्रशासनाने मंगळवारपासूनच तातडीने सुधारणांच्या कामाला सुरुवात केली आहे.अमरधाम परिसरात सुरक्षिततेसाठी आणि गैरप्रकारांवर आळा घालण्यासाठी सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्याचे काम सुरू झाले आहे. अमरधामच्या मुख्य प्रवेशद्वाराचे बांधकाम युद्धपातळीवर हाती घेण्यात आले आहे. गेट पूर्ण होईपर्यंत तात्पुरती व्यवस्था करण्याचे आदेश संबंधित ठेकेदाराला देण्यात आले आहेत. अमरधाममधील व्यवस्थेसाठी कायमस्वरूपी कर्मचाऱ्याची नेमणूक करण्याची प्रक्रियाही प्रशासनाने सुरू केली आहे. पालिकेच्या या तत्परतेमुळे अंत्यसंस्कारासाठी येणाऱ्या नागरिकांना काहीसा दिलासा मिळणार आहे. मृतदेहांची विटंबना टाळण्यासाठी आणि अमरधाममध्ये सन्मानजनक व्यवस्था असावी, यासाठी प्रशासनाने केलेल्या या प्रयत्नांचे नागरिकांकडून स्वागत होत आहे.

# ११ हजारांहून अधिक शेतकरी तालुक्यात पीएम किसान योजनेपासून वंचित

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : केंद्र शासनाच्या प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेचा अपेक्षित लाभ अमळनेर तालुक्यात मोठ्या प्रमाणात शेतकऱ्यांपर्यंत पोहोचलेला नाही. तालुक्यातील एकूण ३६ हजार ३४६ लाभार्थ्यांपैकी तब्बल ११ हजार ७८३ शेतकरी अद्याप या योजनेपासून वंचित असल्याची गंभीर बाब समोर आली आहे. यामुळे शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी पसरली असून प्रशासकीय यंत्रणेच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.यापैकी २ हजार ५८३ शेतकऱ्यांची केवायसी प्रक्रिया अपूर्ण असल्याचे कारण देण्यात आले आहे, तर १ हजार ४४९ लाभार्थ्यांची खाती पुन्हा सक्रिय करण्यासाठी प्रस्ताव जिल्हा नोडल अधिकाऱ्याकडे सादर करण्यात आला आहे. तसेच सुमारे ९ हजार २०० शेतकऱ्यांची खाती इनॲक्टिव्ह करण्यात आल्याची माहितीही समोर आली आहे. अनेक शेतकऱ्यांचे केवायसी, लँड सीडिंग व बँक तपशील पूर्ण असूनही त्यांच्या खात्यावर निधी जमा न झाल्याने संभ्रम निर्माण झाला आहे.

दुसरीकडे, शेतकऱ्यांना माहिती मिळवण्यासाठी तहसील, कृषी विभाग, तलाठी व बँक अशा विविध कार्यालयांचे हेलपाटे मारावे लागत आहेत. मात्र प्रत्येक ठिकाणी वेगवेगळे कारण सांगितले जात असल्याने शेतकऱ्यांची परवड वाढली आहे. काही ठिकाणी स्वतंत्र माहिती देणारी यंत्रणाच उपलब्ध नसल्याने शेतकऱ्यांना समाधानकारक उत्तर मिळत नसल्याचे चित्र आहे. त्यामुळे लाभ मिळणार तरी कधी? असा प्रश्न शेतकरी वर्गातून उपस्थित होत आहे.

**मार्गदर्शनाअभावी शेतकऱ्यांमध्ये असंतोष**

कृषी कार्यालयात नुकतीच काही शेतकऱ्यांनी भेट देत अधिकाऱ्यांना जाब विचारल्याची घटनाही घडली आहे. मात्र उपलब्ध कर्मचाऱ्यांकडून योग्य मार्गदर्शन न मिळाल्याने शेतकऱ्यांमध्ये असंतोष अधिकच वाढला आहे.

> *"कागदपत्रांची पूर्तता केलेल्या १ हजार ४४९ शेतकऱ्यांची खाती पुन्हा सुरू करण्यासाठी स्वतंत्र प्रस्ताव जिल्हा नोडल अधिकारी कार्यालयाकडे पाठविण्यात आला आहे. त्यापैकी काही खाती सुरू झाली असून केवायसी अपूर्ण असल्याने अनेक शेतकऱ्यांचे हप्ते अद्याप प्रलंबित आहेत.*
> ***– सी.जे. ठाकरे,***
> *तालुका कृषी अधिकारी तथा नोडल अधिकारी, अमळनेर*

# साने गुरुजी स्मृतिदिनानिमित्त पूज्य साने गुरुजी ग्रंथालयात अभिवादन

## 'खरा तो एकचि धर्म, जगाला प्रेम अर्पावे'च्या स्वरांत गुरुजींच्या विचारांना उजाळा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : पूज्य साने गुरुजी ग्रंथालय व मोफत वाचनालय, अमळनेर येथे थोर समाजप्रबोधक, साहित्यिक व मानवतावादी विचारवंत पूज्य साने गुरुजी यांच्या स्मृतिदिनानिमित्त अभिवादन कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला. यावेळी साने गुरुजींच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून त्यांच्या कार्याचा व विचारांचा गौरव करण्यात आला.कार्यक्रमाच्या प्रारंभी ग्रंथालयाचे चिटणीस आण्णासाहेब प्रकाश वाघ यांनी साने गुरुजींच्या प्रतिमेचे पूजन केले, तर ज्येष्ठ संचालक भीमराव जाधव यांनी माल्यार्पण करून अभिवादन केले.यावेळी बोलताना ज्येष्ठ संचालक भीमराव जाधव यांनी ग्रंथालयात विविध महापुरुषांच्या प्रतिमा सुबक व व्यवस्थितरित्या लावण्याच्या उपक्रमाबद्दल चिटणीस प्रकाश वाघ यांचे अभिनंदन केले. महापुरुषांच्या प्रतिमांमुळे त्यांच्या विचारांचा वारसा जिवंत राहतो आणि नव्या पिढीला प्रेरणा मिळते, असे त्यांनी सांगितले.कार्यक्रमास ग्रंथालयाचे संयुक्त चिटणीस सुमीत धाडकर, संचालक प्रसाद जोशी, पत्रकार ईश्वर महाजन यांच्यासह अनेक वाचक व मान्यवर उपस्थित होते.यावेळी वाचक दिलीप चव्हाण, रामकृष्ण शेलकर, भिका वाणी, प्रकाश चौधरी, सुरेश महाजन, नारायण जोशी, रघूनाथ घोटकर तसेच ग्रंथालय कर्मचारी मधुकर बाळापूरे व हरीश जाधव यांनीही साने गुरुजींच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून अभिवादन केले.

कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थितांनी साने गुरुजींच्या अजरामर ओळी खरा तो एकचि धर्म, जगाला प्रेम अर्पावे सामूहिकरित्या गात त्यांच्या मानवतावादी, प्रेममय व समतावादी विचारांना उजाळा दिला. या प्रसंगी साने गुरुजींच्या कार्याचा स्मरणोत्सव भावपूर्ण वातावरणात पार पडला.



**अमळनेर : साने गुरुजी स्मृतिदिनानिमित्त अभिवादन प्रसंगी उपस्थित भीमराव जाधव, प्रकाश वाघ सुमीत धाडकर, प्रसाद जोशी, ईश्वर महाजन, दिलीप चव्हाण, रामकृष्ण शेलकर, भिका वाणी, प्रकाश चौधरी, सुरेश महाजन, नारायण जोशी, रघुनाथ घोटकर आदी.**

## संपादकीय

# आताच उघड होत आहे!

...अद्यापही देशभरातील ५० टक्के बँक ठेवी अवघ्या १७ जिल्ह्यांतूनच येतात आणि ५० टक्केपेक्षा अधिक कर्जपुरवठा फक्त ११ जिल्ह्यांतच होतो, हे वास्तव आणि त्यातून दिसणारा असमतोल, तो निवारण्याचा विचार न करणारी धोरणे हे सारेच स्वीकारावे लागते.'जनधन'मुळे जानेवारी २०१५ पासून देशभरात ५४ कोटी नवी बँक खाती, त्यातही ६० टक्के महिलांची, हे यश कौतुकास्पद; पण त्याच्या मर्यादाही विचारीजनांना कळू लागणारच.भौतिक वास्तवापेक्षा काल्पनिक भाकडकथांवर पोट भरून घेणारे समाजात वाढले की विकासाचे काय होते याचे कमालीचे विदारक चित्र रिझर्व्ह बँकेच्या ताज्या अहवालातील आकडेवारीवरून समोर येते. ते तसे रंगवण्याचे पुण्यकर्म राजीव कुमार यांनी नुकतेच 'बिझनेस लाइन' वृत्तपत्रातील लेखात केले. एरवी या लेखकाची संभावना 'अर्बन नक्सल', 'नक्राश्रू ढाळणारे' वा 'विकासविरोधी' इत्यादी ठेवणीतल्या विशेषणांनी करून त्यांच्या प्रतिपादनाकडे दुर्लक्ष करण्याची सोय होती. परंतु प्रस्तुत लेखकांबाबत ती नाही. कारण लेखक राजीव कुमार हे याच सरकारच्या 'नीती आयोगा'चे उपाध्यक्ष होते. साक्षात पंतप्रधान या आयोगाचे अध्यक्ष असतात हे सत्य लक्षात घेतल्यास राजीव कुमार हे विद्यमान सत्ताधीशांच्या दरबारातील राजमान्य मनसबदार ठरतात. ते काही मॉंटेकसिंग अहलुवालिया वा सी. रंगराजन नव्हेत हे मान्य.

पण ज्या अर्थी सरकारला 'धोरणसल्ला' देणाऱ्या 'नीती आयोगा'चे सुकाणू त्यांच्या हाती विद्यमान सरकारने दिले त्याअर्थी त्यांच्या बौद्धिक क्षमतेविषयी सरकारला आदर असणार. अशावेळी हेच राजीवकुमार विकासाचे भयाण भौतिक वास्तव सादर करत असतील तर त्याकडे दुर्लक्ष करणे अयोग्य.देशभरात गेल्या तीन वर्षांत बँकांनी जितका काही पतपुरवठा केला त्याचा निम्म्यापेक्षा अधिक वाटा फक्त ११ जिल्ह्यांतच वितरित झाला, हे कुमार यांच्या लेखाचे सार. हा निष्कर्ष रिझर्व्ह बँकेच्या ताज्या पाहणीवर आधारित आहे. उद्योग, घरबांधणी, व्यवसाय अशा अनेक कारणांसाठी बँकांकडून पतपुरवठा केला जातो. त्याचा तपशील रिझर्व्ह बँकेच्या या अहवालात आहे. कोण, कशासाठी, किती आणि किती कालावधीचे कर्ज घेते इत्यादी तपशील प्रगतीच्या मापदंडातील महत्त्वाचा घटक असतात. त्यावरून विकासाच्या दिशेचा अदमास बांधता येतो. आपल्या देशातील २८ राज्ये आणि आठ केंद्रशासित प्रदेशातील जिल्ह्यांची संख्या ८०० हून अधिक. त्यापैकी ७६२ जिल्ह्यांचा तपशील या अहवालात आहे. अन्य जिल्हे औद्योगिक विकास वा तत्सम उद्योगांसाठी प्रतिबंधित. म्हणून ७६२ जिल्ह्यांतच विविध बँकांकडून पतपुरवठा केला गेला. त्या एकूण पतपुरवठ्यातील ५० टक्क्यांपेक्षा अधिक रक्कम फक्त ११ जिल्ह्यांतच वितरित झाली. म्हणजे उरलेल्या रकमेत ७५१ जिल्ह्यांचा कारभार आटोपला. त्यातही परत लक्षात घ्यायलाच हवी अशी बाब म्हणजे या ११ पैकी तीन जिल्हे असे आहेत की त्यांनीच आपापसात ३० टक्क्यांपेक्षा अधिक पतपुरवठा शोषून घेतला. हे तीन जिल्हे म्हणजे मुंबई शहर, मुंबई उपनगर आणि दिल्ली. देशाच्या एकूण पतपुरवठ्यातील ४३.४ टक्के इतका लक्षणीय वाटा फक्त सात जिल्ह्यांतच झाला असेल तर त्याचा अर्थ स्पष्ट आहे.

एकूण जिल्ह्यांतून हे ११ जिल्हे वगळले तर बाकी सर्वत्र विकासाच्या नन्नाच्या पाढ्याचीच आवर्तने होत असून गेल्या १२ वर्षांत या वास्तवात काडीचाही फरक पडलेला नाही. आपल्या देशाचा खंडप्राय आकार लक्षात घेता किती लहान भूभागाच्या जिवावर भारतमातेचे स्नेहकुशल अवलंबून आहे हे लक्षात यावे. हे कटू वास्तव इतक्यापुरतेच मर्यादित नाही. राजीव कुमार दाखवून देतात की देशातील तब्बल ३८१ जिल्हे असे आहेत की त्या सर्वांमध्ये मिळून राष्ट्रीय पतपुरवठ्यातील जेमतेम ४.९ टक्के इतका अत्यल्प कर्ज वाटा वितरित झाला. यातील अनेक जिल्ह्यांत दिल्या गेलेल्या कर्जाचे सरासरी प्रमाण ०.०२९ टक्के इतके क्षुल्लक आहे. हे झाले पतपुरवठ्याबाबत. तीच काहीशी बाब बँकांतील ठेवींबाबतही दिसून येते. आपल्या देशातील बँकांत जितक्या काही रकमेच्या ठेवी आहेत त्यातील निम्म्या ठेवी फक्त १७ जिल्ह्यांतून मिळालेल्या आहेत. म्हणजे देशातील ७६२ जिल्ह्यांपैकी फक्त १७ जिल्ह्यांतून बँकांत ५० टक्के वा अधिक ठेवी येणार आणि फक्त ११ जिल्ह्यांमध्येच त्यातील निम्मा पतपुरवठा होणार. बाकीचे जिल्हे हे भुईला नव्हे पण निदान बँकिंगच्या नकाशास भार ठरतात.'जनधन', 'मेक इन इंडिया' वगैरे चकचकीत घोषणांच्या यशाचे दावे सत्ताधीशांकडून भले केले जात असतील. पण प्रत्यक्षात या 'जमिनी वास्तवा'त गेल्या दशकभरात काडीचाही फरक पडलेला नाही हे राजीव कुमार दाखवून देतात.

हे आघाडीचे १०–११ जिल्हे सोडले तर लक्षणीय वाढ नोंदवली गेली ती हैदराबादला खेटून असणाऱ्या जिल्ह्यांत. त्यातील ६० टक्क्यांहून अधिक खाती ही महिलांच्या नावे उघडण्यात आलेली आहेत. हे 'प्रधानमंत्री जनधन योजने'चे यश. त्याबाबत दुमत नाही. पण पुढे काय? बँक खाती उघडली गेली म्हणून त्या खात्यात उलाढाल सुरू झाली असे अजिबात नाही. यात आणखी एक मुद्दा असा की जे १० जिल्हे बँकांकडून होणाऱ्या पतपुरवठ्यात आघाडीवर आहेत त्या जिल्ह्यांत आपल्या एकूण लोकसंख्येच्या ७.३ टक्के इतके नागरिक राहतात. म्हणजे ७.३ टक्के इतकी जनता पतपुरवठा मिळवते तो आहे ३८.३ टक्के इतका. या जिल्ह्यातील नागरिक त्या जिल्ह्यांच्या लोकसंख्येतील हिश्शापेक्षा पाचपटीहून अधिक कर्जे मिळवतात. या १० जिल्ह्यांत देशातील मुंबई, दिल्ली इत्यादी महत्त्वाची शहरे आहेत आणि त्यामुळे त्या शहरांतील नागरिकांची आर्थिक पत अधिक असल्याने त्यांना अधिक पतपुरवठा होतो असा युक्तिवाद यावर केला जाईलही.पण त्यातून उलट आपला असमतोल विकास अधिकच अधोरेखित होतो. रिझर्व्ह बँकेच्या ताज्या अहवालातील दिल्लीचा उल्लेख वगळल्यास सर्व काही प्रगती दिसते ती देशाच्या पश्चिम आणि दक्षिणेकडे. उत्तरेतील बिहार, उत्तर प्रदेश, राजस्थान आणि अगदी मध्य प्रदेशही विकासाच्या मुद्द्यावर दक्षिणी राज्यांपेक्षा मागासच आहेत. देशाच्या आर्थिक प्रगतीचा भार प्रामुख्याने आहे तो महाराष्ट्र, कर्नाटक, तमिळनाडू, आंध्र–तेलंगणा आणि काही प्रमाणात गुजरात याच राज्यांवर. बरे, या राज्यांतील विकास समान आणि समतोल आहे असे म्हणावे तर वास्तव तसेही नाही. महाराष्ट्रासारख्या राज्यात गडचिरोली आणि मुंबई यांतील दरडोई उत्पन्नांत प्रचंड तफावत आढळते.खरे तर हे आपले जुनेच दुखणे. म्हणजे हे सर्व आताच उघड होत आहे असेही नाही. तथापि अगदी अलीकडेपर्यंत विद्यमान सरकारशी संबंधित असलेले राजीव कुमार, सुरजित भल्ला असे ज्येष्ठ अर्थतज्ज्ञही देशाच्या विदारक अर्थवास्तवाबद्दल बोलू लागले असतील तर परिस्थिती दाखवली जाते तशी ती नसून अधिक गंभीर आहे असा त्याचा अर्थ.

# विप्रोच्या १५ हजार कोटींच्या शेअरची पुनर्खरेदी

ग्लोबल महातेज वृत्तसेवा




अमळनेर : माहिती–तंत्रज्ञान क्षेत्रातील अग्रणी कंपनी विप्रोच्या समभाग पुनर्खरेदी योजनेला ११ जूनपासून सुरुवात झाली आहे. येत्या १७ जूनपर्यंत भागधारकांना या समभाग पुनर्खरेदी योजनेत सहभागी होता येणार आहे. विप्रोच्या संचालक मंडळाने मंजुरी दिलेल्या योजनेनुसार, कंपनीकडून सुमारे ६० कोटी समभाग प्रत्येकी २५० रुपये किमतीला खरेदी केले जाणार आहेत.

गेल्या महिन्यात १६ एप्रिल रोजी, विप्रोच्या संचालक मंडळाने समभाग पुनर्खरेदीच्या योजनेस मान्यता दिली होती. ही किमत, गेल्या महिन्यात समभाग पुनर्खरेदी जाहीर केलेल्या दिवशी असलेल्या २१० रुपये प्रति समभाग या दरापेक्षा १९ टक्क्यांनी अधिक (प्रीमियमवर) आहे. यापूर्वी विप्रोने वर्ष २०२३ मध्ये १२,००० कोटी, २०१६ सालात २,५०० कोटींची, २०१७ सालात ११,००० कोटींची आणि २०२० मध्ये ९,५०० कोटी रुपये अशा योजनांवर खर्च करून भागधारकांच्या पदरी भरभरून फायदा दिला आहे.

### कोण पात्र?

५ जून २०२६ ही बायबॅकसाठीची रेकॉर्ड डेट होती. त्या दिवशी ज्यांच्या नावावर विप्रोचे समभाग होते, तेच भागधारक या बायबॅकमध्ये सहभागी होऊ शकतात. रेकॉर्ड डेटनंतर समभाग खरेदी करणाऱ्या गुंतवणूकदारांना या योजनेचा लाभ मिळणार नाही.

### किरकोळ गुंतवणूकदारांसाठी विशेष कोटा

सेबीच्या नियमांनुसार, बायबॅकमधील १५ टक्के हिस्सा म्हणजेच ९ कोटी समभाग किरकोळ गुंतवणूकदारांसाठी राखीव ठेवण्यात आला आहे. त्यामुळे लहान गुंतवणूकदारांना तुलनेने जास्त स्वीकार प्रमाण मिळण्याची शक्यता आहे. किरकोळ भागधारकांसाठी पात्रता प्रमाण ५६ समभागांमागे ११ समभाग, तर इतर गुंतवणूकदारांसाठी १९७ समभागांमागे १० समभाग असे निश्चित करण्यात आले आहे.

### किती होऊ शकतो फायदा?

बाजारतज्ज्ञांच्या मते, किरकोळ गुंतवणूकदारांना या बायबॅकमधून मर्यादित पण निश्चित फायदा मिळू शकतो. उदाहरणार्थ, रेकॉर्ड डेटपूर्वी सुमारे दोन लाख रुपयांपर्यंतचे समभाग धारण करणाऱ्या गुंतवणूकदारांना राखीव श्रेणीचा लाभ मिळू शकतो. स्वीकारलेल्या समभागांवर बाजारभावाच्या तुलनेत सुमारे ६० ते ७० रुपये प्रति समभाग अतिरिक्त मिळण्याची शक्यता आहे. काही विश्लेषकांच्या मते, यामुळे सुमारे ७ ते ८ टक्क्यांपर्यंत परतावा मिळू शकतो.

**_अमळनेर सोबत असलेला वारसा_**

***विप्रो या जागतिक आयटी कंपनीचा उगम महाराष्ट्रातील जळगाव जिल्ह्यातील अमळनेर या शहरात झाला.१९४५ मध्ये मोहम्मद हाशम प्रेमजी यांनी या कंपनीची स्थापना केली.सुरुवातीला ही कंपनी सूर्यफूल आणि शेंगदाणा तेल, तसेच वनस्पती तूप (आमिर ब्रँड) बनवण्याचे काम करत होती.अमळनेरच्या अनेक स्थानिक रहिवाशांनी, कर्मचाऱ्यांनी आणि शिक्षकांनी सुरुवातीच्या काळात या कंपनीत गुंतवणूक केली आणि ती दशकांनो–दशके कायम ठेवली.विप्रोच्या सुरुवातीच्या शेअर्सनी दिलेल्या प्रचंड परताव्यामुळे (बोनस शेअर्स) अमळनेरमधील अनेकसामान्य कुटुंब आज कोट्यधीश बनले आहेत.***



*अमळनेर : राष्ट्रीय छात्रसेना (एनसीसी) आयोजित 'अ' प्रमाणपत्र परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करणारे खानदेश शिक्षण मंडळ संचलित जी. एस. हायस्कूलचे यशस्वी विद्यार्थी.*

# जी. एस. हायस्कूलच्या विद्यार्थ्यांचे एनसीसी 'अ' प्रमाणपत्र परीक्षेत यश

## ४६ पैकी ४५ विद्यार्थी उत्तीर्ण; २५ विद्यार्थ्यांना 'अ' श्रेणी

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

अमळनेर : येथील खानदेश शिक्षण मंडळ संचलित जी. एस. हायस्कूलच्या विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय छात्रसेनेतर्फे (एनसीसी) आयोजित 'अ' प्रमाणपत्र परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करत शाळेच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा खोवला आहे. विद्यार्थ्यांच्या मेहनतीला आणि एनसीसी विभागाच्या सातत्यपूर्ण मार्गदर्शनाला या निकालातून यशस्वी पावती मिळाली आहे.

यंदाच्या परीक्षेसाठी शाळेचे एकूण ४६ विद्यार्थी प्रविष्ट झाले होते. त्यापैकी २५ विद्यार्थ्यांनी 'अ' श्रेणी, १९ विद्यार्थ्यांनी 'ब' श्रेणी तर १ विद्यार्थ्याने 'क' श्रेणी प्राप्त करत यश मिळविले. एकूण ४५ विद्यार्थी उत्तीर्ण झाल्याने शाळेच्या निकालाची टक्केवारीही उल्लेखनीय ठरली आहे. एनसीसीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये शिस्त, नेतृत्वगुण, राष्ट्रप्रेम, सामाजिक बांधिलकी आणि जबाबदारीची भावना विकसित होत असते.

या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांनी मिळविलेल्या यशाचे शैक्षणिक व व्यक्तिमत्त्व विकासाच्या दृष्टीने विशेष महत्त्व मानले जात आहे. या यशाबद्दल शाळेचे चेअरमन हरी भिका वाणी, मुख्याध्यापक व्ही. एम. पाटील, उपमुख्याध्यापक ए. डी. भदाणे, पर्यवेक्षक एस. आर. शिंगाणे, सी. एस. सोनजे, शिक्षक प्रतिनिधी राहुल पाटील, पी. एस. काटकर तसेच मुख्य लिपिक जयश्री भालेराव यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

विद्यार्थ्यांच्या या यशामागे एनसीसी विभागप्रमुख संदीप बनसोडे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. त्यांनी विद्यार्थ्यांकडून नियमित सराव, शिस्तबद्ध प्रशिक्षण आणि परीक्षेची प्रभावी तयारी करून घेतली. त्यांच्या मार्गदर्शनामुळे विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट कामगिरी करत शाळेची गौरवशाली परंपरा कायम राखली आहे.

# कारचालकाविरुद्ध गुन्हा दाखल

**मंगरुळ तिहेरी अपघात प्रकरण**

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

अमळनेर : येथील दि.९ रोजी सकाळी सात वाजेच्या सुमारास धुळे अमळनेर महामार्गावर झालेल्या अपघातात सहा जणांचा मृत्यू झाला होता तर दोन जण जखमी झाले होते. या अपघातास कारणीभूत ठरणाऱ्या चारचाकी वाहनचालकावर बस चालकाच्या फिर्यादीवरून गुन्हा दाखल करण्यात आला आहे. धुळे अमळनेर महामार्गावरील मंगरूळ गावाच्या पुढे कार मोटरसायकल व बस असा तिहेरी अपघात सकाळी सात वाजेच्या सुमारास झाला होता. या अपघातात सुरेश विक्रम माळी वय ५२, नंदलाल गोपाल महाजन वय ६०, निर्मलाबाई नंदलाल महाजन वय ५४, अनिता सुरेश महाजन वय ४०, निलेश सुकदेव तावडे वय २५ व फाल्गुनी एकनाथ भोई वय २१ ह्या सहा जणांचा मृत्यू झाला होता तर कार चालक आदित्य चंद्रकांत महाजन वय २३ व दीपक दिलीप पाटील वय ४४ हे जखमी झाले होते. यामुळे बस चालक डी.बी.सोनवणे यांनी अमळनेर पोलिसात दिलेल्या फिर्यादीवरून बलेनो कार क्र. जीजे १९ एएफ ३१४७ वरील चालक आदित्य महाजन याने महामार्गावर अती वेगाने वाहन चालवत विरुद्ध बाजूला चालणाऱ्या मोटरसायकल व बसला धडक देऊन सहा जणांच्या मृत्यूस कारणीभूत ठरल्याने गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास शरद काकळीज करीत आहेत.

# दोधवद येथे गावठाण शिवारात आग

## साडेसहा तास अग्निशमन दल, गावकऱ्यांच्या प्रयत्नांनंतर शमविण्यात यश

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

अमळनेर : तालुक्यातील दोधवद हिंगोणे येथे गावठाण क्षेत्रात भयानक आग लागल्याची घटना १० रोजी दुपारी ३ वाजेला घडली. रात्री साडे नऊपर्यंत सुद्धा आग आटोक्यात आलेली नव्हती. अमळनेर पालिकेचे अग्निशमन दलाचे कर्मचारी शर्थीचे प्रयत्न करीत आहेत.

दुपारी ३ वाजेला आग लागल्यानंतर गावकऱ्यांनी शर्थीचे प्रयत्न केले नंतर मुख्याधिकारी गणेश शिंदे यांना कळवून अग्निशमन दलाच्या



गाड्या पाचारण करण्यात आल्या.अग्निशमन दल प्रमुख गणेश गोसावी यांनी एक लहान आणि एक मोठी गाडी पाठवली. फारूख शेख , दिनेश बिऱ्हाडे , सत्येंन संदानशीव,रफीक पठाण, आकाश संदानशीव या कर्मचार्यांनी सायंकाळपासून आग आटोक्यात आणण्यासाठी शर्थीचे प्रयत्न केले. गावठाणमधील झाडे झुडपे कोरडी झाल्याने आणि गवत देखील सुकलेले असल्याने वाऱ्याने आग जोरात पसरत आहे. विद्युत डीपी,लोकांच्या मोटारी आणि पाईप असल्याने मोठी गाडी जंगलात घुसू शकत नाही म्हणून मोठ्या गाडीतील पाणी लहान गाडीत टाकून आगा विझवण्याचे प्रयत्न केले जात आहेत. जिकडून आग विझवण्याचा प्रयत्न सुरू आहे त्याच दिशेला आग पसरत असल्याने कर्मचार्यांना उष्णतेचा भयानक त्रास होत आहे.

# अमळनेर बसस्थानकाची दुरवस्था; 'आप'चे तहसीलदारांना निवेदन

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

अमळनेर : अमळनेर शहरातील बस स्थानकाची अत्यंत दयनीय अवस्था झाली असून, प्रवाशांना मोठ्या गैरसोयींचा सामना करावा लागत आहे. या प्रश्नाकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी आम आदमी पार्टीच्या पदाधिकाऱ्यांनी तहसीलदार अमळनेर व आगार व्यवस्थापक यांना निवेदन देऊन तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली आहे.

निवेदनात नमूद केल्यानुसार, गेल्या अनेक वर्षांपासून बस स्थानकाची डागडुजी न झाल्याने परिसरात मोठमोठे खड्डे पडले आहेत. पावसाळा सुरू झाल्यामुळे या खड्ड्यांत पाणी साचून चिखल होत असून, प्रवाशांना चालणे कठीण झाले आहे. या अस्वच्छतेमुळे डेंग्यू, मलेरिया यांसारख्या साथीच्या आजारांचा धोकाही वाढला आहे. बसमध्ये चढताना महिला, लहान मुले आणि ज्येष्ठ नागरिकांना मोठी कसरत करावी लागत आहे. बस स्थानक हे सार्वजनिक वाहतुकीचे मुख्य केंद्र असतानाही प्रशासनाचे याकडे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप आप ने केला आहे.आम आदमी पार्टीच्या प्रमुख मागण्या –आगार व्यवस्थापक यांना सूचना देऊन बस स्थानकातील खड्डे त्वरित बुजवण्यात यावेत.पावसाळी पाणी साचू नये म्हणून तातडीने योग्य ड्रेनेज व्यवस्था करण्यात यावी.अमळनेर बस स्थानकाचे सुशोभीकरण करून प्रवाशांसाठी लवकरात लवकर सुविधा उपलब्ध करून द्याव्यात.यावेळी आप चे तालुका अध्यक्ष महेंद्र नाना साळुंखे, तालुका उपाध्यक्ष रामकृष्ण चिंतामण पाटील (देविदास साहेब) यांच्यासह कार्यकर्ते उपस्थित होते. नागरिकांच्या जिव्हाळ्याच्या या प्रश्नावर प्रशासनाने तातडीने दखल घ्यावी, असे निवेदनात म्हटले आहे.




*अमळनेर : नायब तहसिलदार सी. यू. पाटील यांना निवेदन देतांना आपचे तालुक ाध्यक्ष महेंद्र साळुंखे व रामकृष्ण पाटील.*



*अमळनेर : संतश्री सखाराम महाराज संस्थानातर्फे अधिकमास व एकादशीचे औचित्यसाधून विश्वशांतीसाठी गुरुवार, दि. ११ जून रोजी श्री रुक्मिणी व पांडूरंग माऊली यांच्या सान्निध्यात संतश्री प. पू. प्रसाद महाराज यांच्या प्रेरणेने ऑनलाईन व ऑफलाईन या प्रकारांनी १०८ भाविकांच्या सहकार्याने लक्ष तुलसी अर्चन करताना महिला भाविक. ख्यातनाम पुरोहित श्री केशव पुराणिक यांनी पौराहित्य केले.*

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :– आनंद डिगंबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7711004040, 7711004242, ई–मेल : globalmahatej@gmail.com



# महाराष्ट्रातील नमिरा सिद्दिकीचा देशात डंका!

## ‘नीट एमडीएस’ परीक्षेत भारतात पहिली; मुख्यमंत्र्यांनी केले तोंडभरून कौतुक

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

पदव्युत्तर पदवीसाठीच्या राष्ट्रीय पात्रता प्रवेश परीक्षेत (नीट एमडीएस) नागपूरची विद्यार्थिनी नमिरा मोहम्मद गालीब सिद्दिकी हिने देशातून पहिला क्रमांक पटकावला आहे. मूळची भंडारा येथील रहिवासी असलेली नमिरा वानाडोंगरी येथील स्वर्गीय दादासाहेब काळमेघ स्मृती डेंटल कॉलेज अँड हॉस्पिटलची विद्यार्थिनी आहे. तिला यशस्वी ओरल सर्जन व्हायचे आहे. मध्यमवर्गीय कुटुंबात वाढलेल्या नमिराने आपल्या जिद्द आणि चिकाटीच्या जोरावर हे

सक्सेस स्टोरी

यश मिळवले. तिचे वडील व्यावसायिक असून आई गृहिणी आहे. तिचा लहान भाऊ सध्या ‘नीट’ परीक्षेची तयारी करत आहे.



### २४ तासांपैकी केवळ पाच तास झोप

आपल्या यशाचे गमक सांगताना नमिराने तिच्या काटेकोर दिनचर्येबद्दल माहिती दिली. ती म्हणाली, की माझा मुख्य भर हा रात्रीच्या अभ्यासावर होता. दिवसभराच्या गजबजाटापेक्षा रात्री शांततेत अभ्यास करणे मला अधिक सोयीचे वाटायचे. या संपूर्ण प्रवासात झोपेशी तडजोड केली. २४ तासांपैकी केवळ पाच तास झोपायची. उर्वरित वेळ अभ्यासाला द्यायची.

### यशाचे गमक काय?

परीक्षेच्या तयारीबाबत ती म्हणाली, की केवळ पुस्तकी ज्ञानावर अवलंबून न राहता प्रत्यक्ष परीक्षेचा सराव करण्यावर जास्त भर दिला. मागील काही वर्षांच्या प्रश्नपत्रिका वेळेच्या मर्यादेत सोडवण्याचा कमालीचा सराव केला. गतवर्षीच्या प्रश्नपत्रिकांचा हा सरावच तिला परीक्षेत वेळेचे नियोजन आणि अचूकता साधण्यासाठी फायदेशीर ठरला.

### महाराष्ट्रासाठी अत्यंत अभिमानाचा क्षण– मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

नमिरा मोहम्मद गालीब सिद्दिकीने मिळविलेल्या नीट एमडीएस परीक्षेतील यशाबद्दल राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तिचे अभिनंदन केले. फडणवीस म्हणाले, की नागपूर येथील स्वर्गीय दादासाहेब कलमेघ स्मृती दंत महाविद्यालय व रुग्णालय’ची विद्यार्थिनी असलेल्या नामिरा सिद्दीकी हिने नीट एमडीएस २०२६ परीक्षेत संपूर्ण भारतातून प्रथम क्रमांक पटकावल्याबद्दल मनःपूर्वक अभिनंदन! ही खरोखरच एक असाधारण कामगिरी असून, यामुळे राज्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, की भंडारा जिल्ह्याची सुकन्या असलेल्या नामिराने महाराष्ट्राची मान उंचावली असून, असंख्य तरुण उमेदवारांना प्रेरणा दिली आहे. तिची ही कामगिरी तिची जिद्द, शिस्त आणि नैपुण्य यांचे यथार्थ प्रतिबिंब आहे. नामिराच्या पुढील वाटचालीसाठी तिला मनःपूर्वक शुभेच्छा!

# मुघलांच्या सर्वांत क्रूर शिक्षा कोणत्या?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

मुघल काळात गुन्हेगारांना अत्यंत कठोर आणि क्रूर शिक्षा दिल्या जात असत.

**राजद्रोह**

राजद्रोह, चोरी किंवा बंडखोरीसाठी सार्वजनिक शिक्षा देऊन लोकांमध्ये भीती निर्माण केली जायची.

**शिक्षा**

काही दोषींना हत्तीच्या पायाखाली चिरडण्याची शिक्षा दिली जात असे.

**हात–पाय तोडणे**


हात–पाय तोडणे किंवा फाशी देणेही सामान्य मानले जात होते.

**उपाशी**

काही वेळा आरोपींना अनेक दिवस उपाशी ठेवले जात असे. त्यामुळे त्यांचा तडफडून मृत्यू व्हायचा

**इशारा**

भर चौकात शिक्षा देऊन इतरांना इशारा दिला जायचा. त्यामुळे मुघल साम्राज्याविषयी दहशत निर्माण होत असे.



**मुघल सत्तेची ताकद**

कठोर शिक्षा ही मुघल सत्तेची ताकद दाखवण्याचे साधन मानली जात होती.

**मानवी हक्क**

त्या काळातील शिक्षा आजच्या मानवी हक्कांच्या दृष्टीने अत्यंत अमानवी मानल्या जातात.

# गरजेपेक्षा जास्त पाणी पिण्याने शरीरात नक्की काय होते?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

पाणी पिणे शरीरासाठी चांगले असते. पण गरजेपेक्षा जास्त पाणी पिणे आरोग्यासाठी घातक ठरू शकते.

### हायपोनेंट्रेमियाचा धोका

खूप जास्त पाणी प्यायल्याने शरीरातील सोडियमची पातळी झपाट्याने कमी होते, ज्याला वैद्यकीय भाषेत ‘हायपोनेंट्रेमिया’ (Hyponatremia) म्हणतात.

### किडनीवर पडतो ताण

अधिकच्या पाण्यामुळे शरीरातील टॉक्सिन्स बाहेर काढणाऱ्या तुमच्या किडनीवर (मूत्रपिंड) अतिरिक्त ताण पडतो.

### पेशींमध्ये सूज येणे

सोडियम कमी झाल्यामुळे शरीरातील पेशींमध्ये,



विशेषतः मेंदूच्या पेशींमध्ये सूज येण्याचा धोका निर्माण होतो.

### ‘या’ लक्षणांकडे दुर्लक्ष करू नका

सतत डोकेदुखी, चक्कर येणे, उलट्या होणे किंवा थकवा जाणवणे ही अति–हायड्रेशनची (Overhy-dration) मुख्य लक्षणे आहेत.

### हृदयासाठीही नुकसानकारक

शरीरात पाण्याचे प्रमाण जास्त झाल्यास रक्ताचे प्रमाण वाढते, ज्यामुळे हृदयावर पंपिंग करण्याचा ताण वाढतो.

### नक्की किती पाणी प्यावे?

सामान्यतः एका निरोगी व्यक्तीने दिवसातून २ ते ३ लिटर (८ ते १० ग्लास) पाणी पिणे पुरेसे मानले जाते.

### शरीराचे ऐका, अतिरेक टाळा

त्यामुळे फक्त छंद म्हणून किंवा अतिउत्साहात प्रमाणाबाहेर पाणी पिणे टाळा आणि तहान लागेल तसेच पाणी प्या.

# वर्दी में ताली क्यों नहीं बजाते फौजी? वजह जानकर आप भी करेंगे सलाम

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

भारतीय सेना अपनी सख्त अनुशासन प्रणाली और मर्यादा के लिए जानी जाती है। हर सैनिक का आचरण केवल उसके व्यक्तिगत भाव नहीं, बल्कि संस्था की गरिमा का प्रतीक होता है। इन्हीं मर्यादाओं में एक अनोखी परंपरा है वर्दी में ताली न बजाना।



### सेना का अनुशासन और परंपरा

भारतीय सेना में कई ऐसे नियम और परंपराएं हैं जो लिखित न होते हुए भी वर्षों से निभाई जा रही हैं। उनमें से एक यह भी है कि वर्दी में कोई सैनिक किसी कार्यक्रम में ताली नहीं बजाता। यह न तो किसी नियम पुस्तिका में उल्लिखित है और न ही यह दंडनीय प्रावधान है, बल्कि इसे आचार संहिता और अनुशासन का हिस्सा माना जाता है।

### सेना प्रमुख की पहल

इस परंपरा को बल २०१५ में मिला, जब तत्कालीन सेना प्रमुख जनरल दलबीर सिंह सुहाग ने एक आधिकारिक कार्यक्रम के दौरान सैनिकों से कहा था
“मेरा संबोधन समाप्त होने के बाद कृपया ताली न बजाएं। वर्दी में ताली बजाना उचित नहीं है। यह मर्यादा हमें बनाए रखनी चाहिए।”तब से यह परंपरा अनौपचारिक रूप से पूरे सैन्य समुदाय में स्थापित हो गई।

### वर्दी का सम्मान

सेना के लिए वर्दी केवल वस्त्र नहीं, बल्कि जिम्मेदारी, प्रतिष्ठा और शपथ का प्रतीक है। वर्दी पहनने के बाद कोई सैनिक आम नागरिक नहीं रहता। उसके प्रत्येक कार्य को व्यक्तिगत नहीं, बल्कि संस्थागत माना जाता है। इसलिए किसी सार्वजनिक समारोह में ताली बजाना या प्रतिक्रिया देना सेना की मर्यादा के अनुरूप नहीं माना जाता। मिलिट्री एटीकेट और संयम ‘ मिलिट्री एटीकेट ’ यानी सैन्य शालीनता में यह शामिल है कि एक सैनिक कब, कहां और कैसे प्रतिक्रिया देता है। सार्वजनिक रूप से ताली बजाना या जयकार करना सेना की निष्पक्षता को प्रभावित कर सकता है, खासकर राजनीतिक या संवेदनशील कार्यक्रमों में।

### राजनीति से दूरी बनाए रखना

सेना हमेशा गैर–राजनीतिक संस्था रही है। किसी भी वक्ता या कार्यक्रम पर ताली बजाना इस बात का संकेत दे सकता है कि सैनिक किसी राजनीतिक पक्ष या विचार से सहमत हैं यही कारण है कि यह व्यवहार पूरी तरह से टाला जाता है, ताकि जनता का विश्वास और सेना की संवैधानिक निष्ठा बनी रहे।

### अनुशासन का प्रतीक

भले ही ‘ वर्दी में ताली न बजाने ’ को लेकर कोई लिखित नियम नहीं है, लेकिन इसे सेना में अनुशासन और गरिमा का प्रतीक माना जाता है।
यही वह पहचान है जो भारतीय फौज को बाकी संस्थाओं से अलग और ऊंचा बनाती है।

# नाव नसलेले भांडे

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

काही वर्षांपूर्वी घराघरांत एक पद्धत अस्तित्वात होती. ती म्हणजे दुकानातून वापरायची कोणतीही भांडी विकत आणली, की ती आणतानाच त्यावर नाव टाकून आणायची. भांडे लहान वा मोठे प्रश्नच नसे. त्यावर नाव हे असलेच पाहिजे. समजा पत्नी सोबत नसताना जर पती एकटाच दुकानात गेला व गरजेचे भांडे घेऊन घरी आला, की गृहिणी आधी त्यावर नाव काय घातले आहे ते पाहत असे. त्या भांड्यावर तिला तिचे नाव दिसले की देव भेटल्याचा आनंद मिळत असे.

समजा नाव जर दिसले नाहीच तर मात्र काही खरे नसे. ती आल्यापावली पतीला पुन्हा दुकानात पाठवून त्यावर नाव घालून आणा, असे सांगत असे किंवा स्वतः जाऊन नाव घालून आणून मगच ते वापरायला सुरूवात करीत असे.

### काय हो बरोबर आहे ना?

आजही तुमच्या घरात नाव घातलेली खूप भांडी असतील. पण आता दिवस बदलले आहेत. आता विचार हा असतो, की सगळे करायचे; पण कुठे नामोनिशाण ठेवायचा नाही. लग्नकार्यात वा अन्य प्रसंगी आलेली भांडी पाहा. त्यात वर्गवारी होत असे. नाव घातलेली व नाव न घातलेली भांडी वेगळी केली जात असत. नाव असलेली भांडी वापरात घेतली जायची व नाव नसलेली भांडी प्रसंगा–प्रसंगाने देवाण–घेवाणीसाठी वापरली जात असत. अशी ही नाव नसलेली भांडी बेवारस असल्यासारखी या हातातून त्या हातात, या घरातून त्या घरात नुसती फिरत राहायची, उपयोग काहीच नाही. असो. हे सारे आले कशावरून तर नावावरून. आता ती भांडी जरा घडीभर आपण बाजूला ठेवा व विचार करा. आपला देह हेसुद्धा एक पंचभुतांनी बनलेले भांडेच आहे. हे भांडे जन्माला येते तेव्हा त्यावर काही नाव नसतेच. ते असेच फिरत–फिरत आपल्या घरात आलेले असते. मग त्या देहाला आपल्याकडून नाव दिले



जाते आणि ते मरेपर्यंत राहते. पण देह संपला की नाव संपते व विना नावाचा देह या योनीतून त्या योनीत असा विना नावाच्या भांड्यासारखा फिरायला लागतो.

### आता ही पळापळ थांबायला उपाय काय?

उपाय आहे ना. सांगितला आहे आपल्या संत, सत्पुरुष, गुरू, सद्गुरू, समर्थांनी. जमेल तेव्हा, जमेल तसे, जमेल तितके देवाचे नामस्मरण करा. म्हणजे काय होईल? देह जरी पडला तरी देवाचे केलेले नामस्मरण हे सोबत येईल आणि ते नाव एकदा देवाने पाहिले की देव म्हणेल याच्यावर माझे नाव आहे. याला माझ्या घरात पाठवा. ज्या भांड्यांवर माझे नाव नसेल त्यांना द्या पाठवून या योनीतून त्या योनीत फिरायला.

### आपले काय होते माहिती आहे का?

आपण म्हणतो जमेल तसे, जमेल तेव्हा, जमेल तेथे नामस्मरण करा, नाम घ्या, असे सांगितले आहे. पण आपण त्यात पळवाट शोधण्यात पटाईत. आपण म्हणतो जमेल तसे ना! अहो, नाही जमले त्याला आम्ही काय करणार? मग परमपिता म्हणतो. नाही जमले नाव? हरकत नाही. मग रहा फिरत निवांत या योनीतून त्या योनीत. माझे नामस्मरण कर, असे देव कधीच सांगत नाही. तो म्हणतो, की हे सांगायचे काम मी माझ्या प्रतिनिधींवर म्हणजे संत, सत्पुरुष, गुरू, सद्गुरू, समर्थ यांच्यावर सोपविले आहे. ते काम ही मंडळी चोख बजावतात. माझे काम फक्त भांडे माझ्याकडे आले, की त्यावर नाव आहे का ते पाहायचे. नाव असेल तर माझ्यापाशी ठेवायचे. नाव नसेल तर पुढील प्रवासाला द्यायचे पाठवून.

हे एवढ्यासाठीच की वाचा आणि विचार करा. नुसता विचार करू नका. तर अमलात देखील आणा.
धन कमावले कोट्यान्कोटी,
संगे येईना साधी लंगोटी...
बरोबर फक्त नामस्मरणच येईल.

शांत – चांगल्या झोपेसाठी चांगला पलंग नव्हे
तर चांगली गादी आवश्यक आहे.
सर्वोत्तम क्वालिटीच्या गादी साठी



एकमेव ४५
वर्षांचा समृद्ध
अनुभव
असलेले
शोरुम
सीमा हॅण्डलूम हॉउस पारोळा रोड, धुळे






# देवी लक्ष्मींची १०८ नावे

## शुक्रवारी जपा आणि कृपा मिळवा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

देवी लक्ष्मींच्या नावांचा शुक्रवारी जप केल्यास त्यांचा कृपाशीर्वाद लाभून सर्व मंगल होते, अशी धर्मशास्त्रात मान्यता आहे.

१) प्रकृती २) विकृती ३) विद्या ४) सर्वभूतहितप्रदा ५) श्रद्धा ६) विभूति ७) सुरभि ८) परमात्मिका ९) वाचि १०) पद्मलया ११) पद्मा १२) शुचि १३) स्वाहा १४) स्वधा १५) सुधा १६) धन्या १७) हिरण्मयी १८) लक्ष्मी १९) नित्यपुष्टा २०) विभा २१) आदित्य २२) दित्य २३) दीपायै २४) वसुधा २५) वसुधारिणी २६) कमलसम्भवा २७) कान्ता २८) कामाक्षी २९) क्षीरोधसंभवा, क्रोधसंभवा ३०) अनुग्रहप्रदा ३१) बुध्दि ३२) अनघा ३३) हरिवल्लभि ३४) अशोका ३५) अमृता ३६) दीप्ता ३७) लोकशोकविनाशि ३८) धर्मनिलया ३९) करुणा ४०) लोकमात्रि ४१) पद्मप्रिया ४२) पद्महस्ता ४३) पद्माक्ष्या ४४) पद्मसुन्दरी ४५) पद्मोद्भवा ४६) पद्ममुखी ४७) पद्मनाभाप्रिया ४८) रमा ४९) पद्ममालाधरा ५०) देवी ५१) पद्मिनी ५२) पद्मगन्धिनी ५३) पुण्यगन्धा ५४) सुप्रसन्ना ५५) प्रसादाभिमुखी ५६) प्रभा ५७) चन्द्रवदना ५८) चन्द्रा ५९) चन्द्रसहोदरी ६०) चतुर्भुजा ६१) चन्द्ररूपा ६२) इन्दिरा ६३) इन्दुशीतला ६४) आह्लादजननी ६५) पुष्टि ६६) शिवा ६७) शिवकरी ६८) सत्या ६९) विमला ७०) विश्वजननी ७१) तुष्टि ७२) दारिद्र्यनाशिनी ७३) प्रीतिपुष्करिणी ७४) शान्ता ७५) शुक्लमाल्यांबरा ७६) श्री ७७) भस्करि ७८) बिल्वनिलया ७९) वरारोहा ८०) यशस्विनी ८१) वसुन्धरा ८२) उदारांगा ८३) हरिणी ८४) हेममालिनी ८५) धनधान्यकी ८६) सिध्दि ८७) स्त्रैणसौम्या ८८) शुभप्रदा ८९) नृपवेश्मगतानन्दा ९०) वरलक्ष्मी ९१) वसुप्रदा ९२) शुभा ९३) हिरण्यप्राकारा ९४) समुद्रतनया ९५) जया ९६) मंगला देवी ९७) विष्णुवक्षस्स्थलस्थिता ९८) विष्णुपत्नी ९९) प्रसन्नाक्षी १००) नारायणसमाश्रिता १०१) दारिद्र्यध्वंसिनी १०२) देवी १०३) सर्वोपद्रव वारिणी १०४) नवदुर्गा १०५) महाकाली १०६) ब्रह्माविष्णुशिवात्मिका १०७) त्रिकालज्ञानसम्पन्ना १०८) भुवनेश्वरी.



# अधिक मासात मृत्यू येणे शुभ की अशुभ?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अधिक मासात मृत्यू येणे शुभ मानले जाते की ते एखादे अपशकुन आहे, असा प्रश्न लोकांना वारंवार पडतो. हिंदू शास्त्रे आणि ज्योतिषशास्त्रानुसार अधिक मास हा आध्यात्मिकदृष्ट्या अत्यंत पवित्र मानला जातो. कारण हा महिना भगवान विष्णूंना समर्पित आहे. या महिन्यात मांगलिक (शुभ) कार्ये करणे साधारणपणे स्थगित केले जात असले, तरी त्याच वेळी हा काळ मोक्ष (मुक्ती) प्राप्तीसाठी अत्यंत अनुकूल मानला जातो. असा समज आहे, की जो व्यक्ती या विशिष्ट काळात आपला देह ठेवतो त्याला असाधारण आध्यात्मिक पुण्य प्राप्त होते.

**ईश्वरी आश्रयाचा मार्ग**

अधिक मास १७ मे २०२६ (रविवार) ते १५ जून २०२६ (सोमवार) या कालावधीत असेल. धार्मिक तत्त्वांनुसार हा महिना भगवान विष्णूंना समर्पित आहे आणि त्याच्या पवित्रतेमुळे त्याला सर्वोच्च मान दिला जातो. असा समज आहे, की या काळात जो व्यक्ती आपला भौतिक देह सोडून जातो, त्याचा आत्मा थेट सर्वशक्तिमान ईश्वराच्या आश्रयात जातो अर्थात त्यांच्या चरणी विलीन होतो. अशा प्रकारे होणारा मृत्यू ही केवळ एक सामान्य घटना मानली जात नाही, तर ती एक अशी ईश्वरी संधी मानली जाते, ज्याद्वारे आत्मा जन्म-मृत्यूच्या अखंड चक्रातून मुक्ती मिळवू शकतो.

**पापांपासून मुक्ती आणि मोक्षाचे द्वार**

असे म्हटले जाते, की जेव्हा अधिकमासात मृत्यू ओढवतो, तेव्हा त्या व्यक्तीच्या भूतकाळातील कर्मांचा भार लक्षणीयरीत्या हलका होतो. हा काळ आत्मशुद्धीसाठी समर्पित असल्याने या काळात होणारा मृत्यू हा, एका अर्थाने, मोक्षाचे द्वारच मानला जातो. हा दृष्टिकोन भीती दूर करण्यास मदत करतो आणि मृत्यूच्या स्वरूपाविषयी एक आध्यात्मिक दृष्टीकोन विकसित करतो.

**या काळात एखाद्या प्रिय व्यक्तीचे निधन झाल्यास काय करावे?**

जर या महिन्यात एखाद्या व्यक्तीचे निधन झाले, तर कुटुंबाने घाबरून न जाता, अत्यंत आदरपूर्वक आणि शांत चित्ताने अंत्यसंस्कार पार पाडावेत. पिंडदान, दानधर्म आणि ईश्वराचे स्मरण यांसारखे विधी दिवंगत आत्म्याच्या शांतीसाठी हितकारक मानले जातात.

**मलमास या नावाबद्दलचे गैरसमज**

मलमास हा शब्द ऐकताच अनेक लोक चुकून याला अशुभ मानतात; तथापि वस्तुस्थिती मात्र यापेक्षा खूप वेगळी आहे. येथे मल या शब्दाचा अर्थ अशुद्धता असा होत नाही, तर तो अतिरिक्त काळ दर्शवतो, हा असा एक विशिष्ट कालावधी आहे जो केवळ आध्यात्मिक साधना आणि ईश्वरभक्तीसाठीच प्रदान करण्यात आला आहे. परिणामी या काळात होणारा मृत्यू हे काही अशुभ लक्षण मानले जात नाही, तर त्याकडे एक विशिष्ट आध्यात्मिक घटना म्हणूनच पाहिले जाते.

# अधिक मासात चुकूनही करू नका ही ५ कामे

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

हिंदू धर्मात अधिक मासाला (पुरुषोत्तम मास) अत्यंत पवित्र आणि धार्मिक महत्त्वाचा महिना मानला जातो. हा महिना भगवान विष्णूंच्या पूजेसाठी समर्पित असतो. या काळात नामस्मरण, दानधर्म आणि तपश्चर्येला विशेष महत्त्व आहे. परंतु शास्त्रांनुसार या पवित्र महिन्यात काही कामे वर्ज्य मानली गेली आहेत. अधिक मासात चुकूनही कोणत्या गोष्टी करू नयेत, याची सविस्तर माहिती खालीलप्रमाणे आहे.




**१) शुभ आणि मांगलिक कार्ये करणे टाळावे**

अधिक मासाला 'मलमास' असेही म्हणतात. या काळात ग्रहांची स्थिती शुभ कार्यांसाठी अनुकूल नसते. त्यामुळे खालील मांगलिक कार्ये या महिन्यात करू नयेत:

**विवाह (लग्न) :** या महिन्यात लग्न ठरवणे किंवा करणे अशुभ मानले जाते.

**मुंज (उपनयन संस्कार) :** मुलांचा मुंज संस्कार या काळात केला जात नाही.

**गृहप्रवेश :** नवीन घरात प्रवेश करणे किंवा वास्तुशांती करणे टाळावे.

**नवीन व्यवसाय सुरू करणे :** नवीन दुकान, व्यवसाय किंवा भागीदारीची सुरूवात या महिन्यात करू नये.

**२) नवीन वस्तूंची खरेदी टाळावी**

या महिन्यात भौतिक सुखाच्या वस्तू खरेदी करणे शास्त्रात वर्ज्य मानले आहे.

**वाहने आणि दागिने :** नवीन गाडी, सोने-चांदी किंवा मौल्यवान दागिने खरेदी करू नयेत.

**नवीन जमीन किंवा घर :** नवीन मालमत्ता खरेदी करणे किंवा त्याचे बुकिंग करणे टाळावे.

**३) तामसिक अन्न आणि व्यसनांपासून दूर राहावे**

हा महिना पूर्णपणे अध्यात्माचा काळ असल्याने शरीरातील आणि मनातील शुद्धता राखणे गरजेचे आहे.

**मांसाहार आणि मद्यपान :** या महिन्यात चुकूनही मांसाहार करू नये आणि मद्यपानापासून दूर राहावे.

**कांदा आणि लसूण :** शक्य असल्यास सात्विक आहार घ्यावा. कांदा, लसूण किंवा अती तिखट-मसालेदार (तामसिक) अन्न खाणे टाळावे.

**नशा किंवा जुगार :** कोणत्याही प्रकारच्या वाईट सवयी किंवा व्यसनांमध्ये वेळ वाया घालवू नये.

**४) कोणाचाही अपमान किंवा वादविवाद करू नका**

मनाची शुद्धता हा या महिन्याचा मुख्य उद्देश आहे.

**भांडण-तंटे :** घरात किंवा बाहेर कोणाशीही वाद घालू नका. राग आणि द्वेष या भावनांवर नियंत्रण ठेवा.

**खोटे बोलणे किंवा निंदा करणे :** कोणाच्या पाठीमागे त्याची उणीदुणी काढणे (चुगल्या करणे) किंवा खोटे बोलणे यामुळे पाप वाढते, असे मानले जाते.

**अनादर :** कोणत्याही गरजू व्यक्तीचा, साधू-संतांचा किंवा घरातील मोठ्या माणसांचा अपमान करू नका.

**५) नवीन व्रत किंवा नवस सुरू करू नका**

जर तुमचे एखादे व्रत आधीपासून सुरू असेल (उदा.- सोळा सोमवार, संकष्टी चतुर्थी), तर ते तुम्ही चालू ठेवू शकता. परंतु कोणतेही नवीन व्रत किंवा नवस या महिन्यात सुरू करू नये.

**मग अधिक मासात काय करावे?**

या महिन्यात कोणतेही नवीन काम सुरू करण्याऐवजी 'नित्या कर्म' (रोजची पूजा) करावी. भगवान विष्णूंचे नामस्मरण करावे, विष्णूसहस्त्रनामाचा पाठ करावा आणि गरजू लोकांना शक्य तेवढे दान (विशेषतः दीपदान आणि अनारशांचे दान) करावे. यामुळे जीवनात सुख-समृद्धी लाभते.

# शुक्रवारी कोणत्या मंत्राचा जप करावा?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

जीवनात सर्व सुख-सुविधा आणि भौतिक सुखे मिळावीत तसेच धनाची देवी लक्ष्मींचा आशीर्वाद मिळावा, अशी प्रत्येकाची इच्छा असते. अशात लक्ष्मी देवींच्या पूजेसाठी शुक्रवारचा दिवस विशेष मानला जातो. असे म्हटले जाते की देवी लक्ष्मींचा आशीर्वाद असलेल्या घरात कधीही संपत्ती आणि समृद्धीची कमतरता नसते. शुक्रवारी देवी लक्ष्मींच्या मंत्रांचा जप खूप फायदेशीर ठरतो.

**देवी लक्ष्मी चमत्कारी मंत्र**

घरात अन्न-धन प्राप्तीसाठी
पद्‌मानने पद्म पद्माक्ष्मी पद्म संभवे
तन्मे भजसि पद्माक्षि येन सौख्यं
लभाम्यहम्।

**लक्ष्मी महामंत्र**

ऊँ श्रीं ल्कीं महालक्ष्मी महालक्ष्मी
एह्येहि सर्व सौभाग्यं देहि मे स्वाहा।

**सुखी दाम्पत्य जीवनासाठी**

लक्ष्मी नारायण नमः

**माता लक्ष्मी बीजमंत्र**

ऊँ श्रींह्रीं श्रीं कमले कमलालये
प्रसीद प्रसीद श्रीं ह्रीं श्रीं ऊँ
महालक्ष्मी नमः।

**मनोकामना पूर्तीसाठी**

ऊँ नमो भाग्य लक्ष्म्यै च विद्महे
अष्ट लक्ष्म्यै च धीमहि तन्नो लक्ष्मी
प्रचोद्यात ।

**आर्थिक अडचण दूर करण्यासाठी**

ॐ ह्रीं श्री क्रीं क्लीं श्री लक्ष्मी मम
गृहे धन पूरये, धन पूरये, चिंताएं
दूरये-दूरये स्वाहाः ।

**लक्ष्मी स्थिर मंत्र**

'ॐ स्थिर लक्ष्म्यै नमः' अथवा
'ॐ अन्न लक्ष्म्यै नमः'।

जेमोलॉजीनुसार शुक्र ग्रहाला बळ देण्यासाठी हिरा धारण करावा. जर हिरा घालणे शक्य नसेल तर शुक्राचा उपरत्न दतला, कुरंगी,सिम्मा घालू शकता.

शुक्र ग्रहाला बल देण्यासाठी शुभ्र वस्त्रे परिधान करून ॐ द्रां द्रीं द्रौं सः शुक्राय नमः या मंत्राचा शुक्रवारी ५, ११ किंवा २१ वेळा जप करावा.

**या पद्धतीने मंत्राचा जप करा**

शुक्रवारी देवी लक्ष्मींच्या मंत्रांचा जप करण्यापूर्वी सकाळी स्नान करून स्वच्छ वस्त्र परिधान करावे. नंतर घरातील मंदिर स्वच्छ करावे. मंदिरातील लक्ष्मींच्या मूर्तीसमोर तुपाचा दिवा लावावा आणि देवींची पूजा करावी. नंतर मंदिरात स्वच्छ आसनावर बसून स्फटिक किंवा कमळाच्या माळाने मंत्रांचा जप करावा. या प्रकारे जप केल्याने लवकरच लाभ होईल.

# बगलामुखी देवींची पूजा पद्धत, मंत्र, आरती, चालिसा, कथा आणि फायदे

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

हिंदू पंचांगानुसार बगलामुखी देवींचा जन्मदिवस दरवर्षी वैशाख महिन्याच्या शुक्ल पक्षाच्या आठव्या दिवशी साजरा केला जातो. बगलामुखी देवी दहा महाविद्यांपैकी आठवी देवी आहेत. त्यांना पितांबरा म्हणूनही ओळखले जाते. कारण त्यांना पिवळा रंग आवडतो. त्यांचे रूप अत्यंत प्रभावी आहे. त्या पिवळे वस्त्र परिधान करतात, पिवळ्या दागिन्यांनी सजलेल्या असतात आणि पिवळ्या कमळावर बसलेल्या असतात. त्यांना चार हात आहेत; एका हातात गदा धारण करतात, तर दुसऱ्या हातात शत्रूची जीभ धरतात आणि इतर दोन हातांनी त्या भक्तांना आशीर्वाद देतात.

**मंत्र : बगलामुखी देवींचे काही महत्त्वाचे मंत्र**

- **मूळ मंत्र :** 'ओम हलेम बगलामुखी सर्व रोष्टनाम वचन मुखम पदम स्तंभय जिहवावन कील्या बुद्धिम विनाशाय ह्रीम ओम स्वाहा।'
- **बीज मंत्र :** 'ह्लीम।'
- **बगलामुखी गायत्री मंत्र :** 'ओम बगलामुख्यै च विद्महे स्तम्भिनयै चा धीमही तन्नो बगला प्रचोदयात।'

**॥ दोहा ॥**
बगलामुखी की आरती,पढ़ै सुनै जो कोय।
विनती कुलपति मिश्र की,सुख-सम्पति सब होय॥
।।अथ श्री बगलामुखी चालिसा।।

**।।दोहा।।**
नमो महाविधा बरदा, बगलामुखी दयाल।
स्तम्भन क्षण में करे, सुमरित अरिकुल काल।।
नमो नमो पीताम्बरा भवानी, बगलामुखी नमो कल्यानी ।१।
भक्त वत्सला शत्रु नशानी, नमो महाविधा वरदानी ।२।
अमृत सागर बीच तुम्हारा, रत्न जड़ित मणि मंडित प्यारा ।३।
स्वर्ण सिंहासन पर आसीना, पीताम्बर अति दिव्य नवीना ।४।
स्वर्णभूषण सुन्दर धारे, सिर पर चन्द्र मुकुट श्रृंगारे ।५।
तीन नेत्र दो भुजा मृणाला, धारे मुद्गर पाश कराला ।६।
भैरव करे सदा सेवकाई, सिद्ध काम सब विघ्न नसाई ।७।
तुम हताश का निपट सहारा, करे अकिंचन अरिकल धारा ।८।
तुम काली तारा भुवनेशी, त्रिपुर सुन्दरी भैरवी वेशी ।९।
छिन्नभाल धूमा मातंगी, गायत्री तुम बगला रंगी ।१०।
सकल शक्तियाँ तुम में साजें, ह्रीं बीज के बीज बिराजे ।११।
दुष्ट स्तम्भन अरिकुल कीलन, मारण वशीकरण सम्मोहन ।१२।
दुष्टोच्चाटन कारक माता, अरि जिव्हा कीलक सघाता ।१३।
साधक के विपति की त्राता, नमो महामाया प्रख्याता ।१४।
मुद्गर शिला लिये अति भारी, प्रेतासन पर किये सवारी ।१५।



तीन लोक दस दिशा भवानी, बिचरहु तुम हित कल्यानी ।१६।
अरि अरिष्ट सोचे जो जन को, बुध्दि नाशकर कीलक तन को ।१७।
हाथ पांव बाँधहु तुम ताके,हनहु जीभ बिच मुद्गर बाके ।१८।
चोरो का जब संकट आवे, रण में रिपुओं से घिर जावे ।१९।
अनल अनिल बिप्लव घहरावे, वाद विवाद न निर्णय पावे ।२०।
मूठ आदि अभिचारण संकट, राजभीति आपत्ति सन्निकट ।२१।
ध्यान करत सब कष्ट नसावे, भूत प्रेत न बाधा आवे ।२२।
सुमरित राजव्दार बंध जावे, सभा बीच स्तम्भवन छावे ।२३।
नाग सर्प ब्रर्चिश्रकादि भयंकर, खल विहंग भागहिं सब सत्वर ।२४।
सर्व रोग की नाशन हारी, अरिकुल मूलच्चाटन कारी ।२५।
स्त्री पुरुष राज सम्मोहक, नमो नमो पीताम्बर सोहक ।२६।
तुमको सदा कुबेर मनावे, श्री समृद्धि सुयश नित गावें ।२७।
शक्ति शौर्य की तुम्हीं विधाता, दुःख दारिद्र विनाशक माता।२८।
यश ऐश्वर्य सिद्धि की दाता, शत्रु नाशिनी विजय प्रदाता।२९।
पीताम्बरा नमो कल्यानी, नमो माता बगला महारानी ।३०।

**बगलामुखी देवींची आरती**

**जय जय श्री बगलामुखी माता, आरति करहुँ तुम्हारी।**
**पीत वसन तन पर तव सोहै,कुण्डल की छबि न्यारी॥**
**कर-कमलों में मुद्गर धारै,अस्तुति करहिं सकल नर-नारी॥**
**जय जय श्री बगलामुखी माता...।**
**चम्पक माल गले लहरावे,सुर नर मुनि जय जयति उचारी॥**
**त्रिविध ताप मिटि जात सकल सब,भक्ति सदा तव है सुखकारी॥**
**जय जय श्री बगलामुखी माता...।**
**पालत हरत सृजत तुम जग को,सब जीवन की हो रखवारी॥**
**मोह निशा में भ्रमत सकल जन,करहु हृदय महँ, तुम उजियारी॥**
**जय जय श्री बगलामुखी माता...।**
**तिमिर नशावहु ज्ञान बढ़ावहु,अम्बे तुमही हो असुरारी॥**
**सन्तन को सुख देत सदा ही,सब जन की तुम प्राण पियारी॥**
**जय जय श्री बगलामुखी माता...।**
**तव चरणन जो ध्यान लगावै,ताको हो सब भव-भयहारी॥**
**प्रेम सहित जो करहिं आरती,ते नर मोक्षधाम अधिकारी॥**
**जय जय श्री बगलामुखी माता...।**

जो तुमको सुमरै चितलाई, योग क्षेम से करो सहाई ।३१।
आपत्ति जन की तुरत निवारो, आधि व्याधि संकट सब टारो ।३२।
पूजा विधि नहिं जानत तुम्हरी, अर्थ न आखर करहूँ निहोरी ।३३।
मैं कुपुत्र अति निवल उपाया, हाथ जोड़ शरणागत आया ।३४।
जग में केवल तुम्हीं सहारा, सारे संकट करहुँ निवारा ।३५।
नमो महादेवी हे माता, पीताम्बरा नमो सुखदाता ।३६।
सोम्य रूप धर बनती माता, सुख सम्पत्ति सुयश की दाता ।३७।
रोद्र रूप धर शत्रु संहारो, अरि जिव्हा में मुद्गर मारो ।३८।
नमो महाविधा आगारा, आदि शक्ति सुन्दरी आपारा ।३९।
अरि भंजक विपत्ति की त्राता, दया करो पीताम्बरी माता ।४०।

**।।दोहा।।**
रिद्धि सिद्धि दाता तुम्हीं, अरि समूल कुल काल।
मेरी सब बाधा हरो, माँ बगले तत्काल।।

**बगलामुखी देवींच्या पूजेची पद्धत**

**१) स्नान आणि वस्त्रे:** सकाळी लवकर स्नान करा आणि पिवळे कपडे घाला, कारण पिवळा रंग माता बगलामुखीला प्रिय आहे.
**२) पूजास्थळाची तयारी:** पूजास्थळ स्वच्छ करून त्यावर पिवळी चटई अंथरा. देवी बगलामुखीची मूर्ती किंवा चित्र स्थापित करा.
**३) संकल्प:** पूजा करण्याचा दृढनिश्चय करा.
**४) आमंत्रण:** माता बगलामुखीचे आवाहन करा.
**५) स्थापना:** त्याचा पुतळा स्थापित करा.
**६) अभिषेक:** शक्य असल्यास, पाण्याने आणि पंचामृताने अभिषेक करावा.
**७) वस्त्र आणि दागिने:** मातेला पिवळे वस्त्र आणि पिवळे दागिने अर्पण करा.
**८) फुले आणि हार:** पिवळी फुले आणि हळदीचा हार अर्पण करा.
**९) धूप आणि दिवे:** धूप आणि दिवे लावा.
**१०) नैवेद्य :** पिवळी फळे, पिवळी मिठाई आणि चणाडाळ अर्पण करा.
**११) हळदीचा टिळा :** आपल्या आईला हळदीचा टिळा लावा आणि स्वतःही लावा.
**१२) मंत्रांचा जप :** माँ बगलामुखीच्या मंत्रांचा जप करा.
**१३) गोष्ट ऐका :** बगलामुखी जयंतीची गोष्ट ऐका.
**१४) आरती :** माँ बगलामुखीची आरती करा.
**१५) प्रसाद वाटप :** पूजेनंतर प्रसाद वाटा.

**बगलामुखी देवींची आख्यायिका**

एके काळी एका राक्षसाने देवांचा पराभव करून स्वर्गावर ताबा मिळवला. भयभीत झालेल्या देवांनी देवी दुर्गेचा आश्रय घेतला. देवी दुर्गेने बगलामुखीचे रूप धारण करून त्या राक्षसाचा वध केला आणि देवांचे राज्य त्यांना परत मिळवून दिले. धार्मिक मान्यतेनुसार महाभारताच्या युद्धापूर्वी भगवान कृष्ण आणि अर्जुन यांनीही बगलामुखी देवींची पूजा आणि ध्यान केले होते.

**बगलामुखी देवींच्या पूजेचे फायदे**

**वाईटावर चांगल्याचा विजय :** असे मानले जाते, की याच दिवशी बगलामुखी देवी प्रकट झाल्या आणि त्यांनी पृथ्वीला विनाशकारी शक्तींपासून वाचवले. त्यामुळे हा दिवस वाईटावर चांगल्याच्या विजयाचे प्रतीक मानला जातो.

**शत्रूंवर विजय :** बगलामुखी देवींना शत्रूंचा नाश करणारी मानले जाते. त्यांची उपासना केल्याने भक्तांना शत्रूंवर विजय आणि नकारात्मक शक्तींपासून संरक्षण प्राप्त होते.

**कायदेशीर बाबींमध्ये यश :** कायदेशीर वाद आणि न्यायालयीन खटल्यांमध्ये यश मिळविण्यासाठी बगलामुखी देवींची पूजा करणे उपयुक्त मानले जाते.

**वाक्‌सिद्धी :** बगलामुखी देवींच्या कृपेने वाक्‌सिद्धी प्राप्त होते. ज्याद्वारे व्यक्ती आपल्या वाणीने इतरांवर प्रभाव टाकू शकते.

**भय आणि संभ्रमाचा नाश :** त्यांच्या उपासनेने भय आणि संभ्रम दूर होतो आणि आत्मविश्वास वाढतो.

(वरील माहिती विविध धर्मग्रंथांतून संकलीत केली आहे.)